## रे. दि. मु. नं. १५७/२०२३ मधील निशाणी क्र. ३१ चे अर्जावरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादींनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ अन्वये त्यांच्या निशाणी क्र. २५ कडील कैफियत व म्हणण्यामध्ये आणि प्रतिदाव्यामध्ये आवश्यक मजकूर समाविष्ट करून दुरूस्ती करण्याकरिता दाखल केला आहे. वादींतर्फे प्रस्तुत अर्जास निशाणी क्र. ३४ कडे त्यांचे म्हणणे दाखल केले आहे.

२) प्रस्तुत अर्जात प्रतिवादींनी असे कथन केले आहेत की, वादींनी प्रस्तुतचा दावा मे. तहसीलदारसाो, जत यांचेकडील कलम ५ अन्वये दि. २३/०२/२०२३ रोजी दिलेला निकाल रद्दबातल आहे असे जाहीर होऊन मिळण्याकरिता व निरंतर ताकिदीकरिता दाखल केला आहे. सदर दाव्यास प्रतिवादींनी दि. १६/०८/२०२३ रोजी निशाणी क्र. २५ कडे ऐन दाव्यास कैफियत व तूर्तातूर्त ताकीद अर्जास म्हणणे तसेच वादींविरुद्ध प्रतिदावा दाखल केला आहे. सदरचा दावा प्रतिवादींनी मे. तहसीलदार यांचा आदेश रद्दबातल होण्यासाठी दाखल केला आहे. तथापि, मे. तहसीलदार यांनी वडिलोपार्जित असलेला रस्ता हा त्या रस्त्याची शहानिशा करून व रस्त्याची पाहणी करून रस्ता मोकळा करून वादी व प्रतिवादी यांची मिळकत ही वडिलोपार्जित व एकाच सर्वे नंबरमधील असल्याने पूर्वीपासून येणे–जाणेचा रस्ता खुला करून देण्याचा आदेश केला आहे. म्हणून प्रतिवादींनी दाव्यामध्ये कैफियत व प्रतिदावा दाखल केला आहे. सदर दावेमध्ये नजरचुकीने काही वाक्य रचना राहिलेली आहे. ती दुरूस्ती करणे जरुरीचे आहे. सदर दुरूस्तीमुळे वादींचे काहीही नुकसान होणार नाही. याउलट तशी दुरूस्ती न केल्यास प्रतिवादींचे अतोनात नुकसान होणार आहे. तरी प्रस्तुत अर्जातील परिच्छेद २) मध्ये सविस्तर नमूद केल्याप्रमाणे मजकूर मूळ कैफियतीमध्ये व प्रतिदाव्यामध्ये समाविष्ट करण्यासाठी दुरूस्ती करण्याची परवानगी देण्यात यावी अशी विनंती प्रतिवादींनी केली आहे.

३) वादींतर्फे प्रस्तुत अर्जास असे म्हणणे दाखल केले की, प्रस्तुतचा अर्ज खोटा, लबाडीचा व बेकायदेशीर आहे. मूळ कैफियत व प्रतिदाव्यामध्ये झालेल्या चुका दुरुस्त

करण्यासाठी हे उशिरा सुचलेले शहाणपण आहे. कैफियत दाखल करून २ महिनेही झाले नाहीत. त्यावेळी त्यामध्ये झालेल्या चुकांचा साक्षात्कार प्रतिवादींना झालेला दिसतो. कैफियत व प्रतिदावा दाखल करतेवेळी प्रतिवादींना सर्व त्या दुरुस्त्या करता आल्या असत्या. दावा दाखल झाल्यानंतर प्रतिवादींनी त्यांची कैफियत वेळेत दाखल केली नाही. तरी त्यांच्याकडून दिरंगाई व अक्षम्य चुका झाल्या आहेत. दुरुस्त अर्जामध्ये नव्याने काहीच घडले नाही. केवळ हलगर्जीपणा व बेफिकीर वृत्तीमुळे या चुका झाल्या आहेत. त्या अशा अर्जाने दुरुस्त करता येणार नाहीत. या सर्व बाबींचा विचार करता प्रस्तुतचा अर्ज खर्चासह नामंजूर करण्यात यावा. यदाकदाचित मे. न्यायालय अर्ज मंजूर करण्याच्या निर्णयाप्रत आल्यास झालेल्या दिरंगाईबाबत प्रतिवादींना जास्तीत जास्त दंड आकारण्यात यावा अशी विनंती प्रतिवादींतर्फे करण्यात आली आहे.

४) अर्ज व म्हणणे वाचले. संचिकेचे व सोबतच्या कागदपत्रांचे अवलोकन केले. उभय पक्षकारांच्या विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला.

५) दावा व अर्जाचे अवलोकन केले असता वादींनी दावा जाहीरनामेकरिता आणि निरंतर ताकिदीकरिता दाखल केला असल्याचे दिसून येते. तसेच प्रतिवादींनी प्रस्तुत अर्जान्वये मागितलेल्या दुरुस्त्या या कैफियत व प्रतिदावा दाखल करीत असताना अनावधानाने व नजरचुकीने काही मजकूर नमूद करण्याचे राहून गेल्याबाबत असल्याने त्यांना तशा दुरुस्त्या करण्याची परवानगी प्रतिवादींना देणे जरुरीचे आहे. तसे न केल्यास प्रकरणात निष्कारण गुंतागुंत होऊन प्रकरणांची अनेकता होण्याची दाट शक्यता आहे. दुरुस्त्या मंजूर केल्यास वादींचे कोणतेही नुकसान संभवत नाही. तसेच कैफियतीच्या व प्रतिदाव्याच्या मूळ स्वरूपात बदल देखील संभवत नाही. त्याचबरोबर प्रतिवादींनी सदरचा अर्ज दाव्याचे कामी चौकशी सुरू होण्यापूर्वीच दाखल केला असल्यामुळे त्यास दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ मधील परंतुकाच्या तरतुदीची बाधा येत नाही. तथापि, त्याचवेळी वादीने प्रस्तुतचा अर्ज हा दाव्याचे कामी निशाणी क्र. ५ कडील तूर्तातूर्त ताकीद अर्जावर युक्तिवाद करण्याकरिता नेमलेले असताना बराच कालावधी लोटून गेल्यावर दि. ०१/११/२०२३ रोजी दाखल केल्यामुळे झालेल्या विलंबाकरिता

प्रतिवादींनी वादींना खर्चाची रक्कम देण्याचे आदेशीत करणे देखील जरुरीचे आहे. प्रस्तुत प्रकरणातील तथ्यांचा व झालेला विलंबाचा सारासार विचार केला असता प्रतिवादींनी या अर्जाचे एकूण खर्चाची रक्कम म्हणून रू. २००/– देण्याचे आदेशीत केल्यास न्यायोचित समतोल साधला जाईल असे माझे मत आहे. या सर्व बाबींचा विचार करून मी पुढीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

१. प्रस्तुत अर्ज प्रतिवादींनी वादींना एकूण खर्चाची रक्कम रू. २००/– देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादींनी वादींना वर नमूद केल्याप्रमाणे खर्चाची रक्कम अदा केल्यानंतर प्रस्तुत अर्जातील परिच्छेद क्र. २) मध्ये सविस्तर नमूद केल्याप्रमाणे मजकूर त्यांची मूळ कैफियत व प्रतिदावा निशाणी क्र. २५ मध्ये समाविष्ट करण्यासाठीच्या आवश्यक त्या दुरुस्त्या करण्यास परवानगी प्रतिवादींना देण्यात येते.

३. प्रतिवादींनी सदर आदेशाच्या अनुषंगाने आवश्यक त्या दुरुस्त्या मूळ कैफियत व प्रतिदावा निशाणी क्र. २५ मध्ये ज्या त्या ठिकाणी वैधानिक कालावधीमध्ये करून घेण्याचे तसेच दुरुस्त कैफियतची प्रत दाखल करण्याचे प्रतिवादींना निर्देशित करण्यात येत आहे.

स्वाक्षरित/–

स्थळ:– जत
दि. ०३/०१/२०२४

(एकनाथ को. चौगले)
(JO Code -MHSN2400)
दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
जत

**<u>प्रमाणपत्र</u>**

मी असे प्रमाणित करतो की, या पी.डी.एफ. फाईलमधील मजकूर व मूळ आदेशामधील मजकूर हा एकसारखा आहे.

| | |
|---|---|
| स्टेनोग्राफरचे नांव | श्री. एस. ए. जमादार (लघुलेखक श्रेणी–III) |
| कोर्टाचे नांव | श्री. एकनाथ को. चौगले.<br>दिवाणी न्यायाधीश क.स्तर व प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, जत. |
| दिनांक | ०३/०१/२०२४ |
| पीठासीन अधिकारी यांनी सही केलेली तारीख | ०३/०१/२०२४ |
| आदेश अपलोड केलेली तारीख | ०६/०१/२०२४ |